सैनिकी शाळेतील विमुक्त जाती, भटक्या जमाती
व विशेष मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना
निर्वाह भत्ता देण्याबाबत.
उत्पन्न मर्यादेत वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - विजाभ-२००६/ प्र.क्र. १६२/मावक-३
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ जानेवारी २००८.

वाचा : १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्रमांक:इबीसी-१०७४/५६४२३/डी-५ दि. ०६/०८/१९७६.

२) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक: संकिर्ण-२००२/प्र.क्र. ३७१/मावक-३, दि. ०५/०८/२००३

३) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक. इबीसी-२००३/प्र.क्र. १८४/मावक-२, दि. १७/०९/२००३

**प्रस्तावना:-** वर नमुद केलेल्या अनुक्रमांक १ येथील शासन निर्णयानुसार सैनिकी शाळेत शिक्षण घेणा-या अनुसूचित जातीच्या व विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची योजना लागू केली आहे.त्यानंतर वर नमुद केलेल्या अनुक्रमांक २ येथील शासन निर्णय नुसार ही योजना विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात आली त्यानंतर वर नमुद केलेल्या अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये निर्वाह भत्याची वार्षिक शुल्काची रक्कम रु. १५,०००/- इतकी करण्यात आली असून विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. ६५,२९०/- च्या मर्यादेत असणा-या विद्यार्थ्यांना लागू करण्यात आली. सर्व योजनांमध्ये उत्पन्नाच्या मर्यादेत एकसुत्रता असावी म्हणून विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्नाची मर्यादा रु.६५,२९०/- हून रु.१,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) इतकी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>**शासन निर्णय**</u> :- सैनिकी शाळेत शिक्षण घेणा-या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे या योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्नाची मर्यादा रु. ६५,२९०/- हून रु. १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) इतकी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा शासन निर्णय सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपासून पुढे लागू राहिल. पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहणार नाही.

३. या योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांच्या आई-वडील/पालकांनी उत्पन्नाबाबत सादर करावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना सोबत जोडला आहे.